पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम
काटा रोड,सिव्हील लाईन,वाशिम, ता जि वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र.०७२५२–२३४८३४
ई–मेल sp.washim@mahapolice.gov.in
Website:-www.washimpolice.gov.in

दिनांक :– १५/१०/२१

**मा. पोलीस अधीक्षक श्री. बच्चन सिंग यांचे हस्ते वाशिम जिल्हा पोलीस दलात विजयादशमी निमित्त शस्त्रपुजन,वाहनपुजन तसेच थोर शास्त्रज्ञ तथा भारत देशाचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम, यांची जयंती साजरी करण्यात आली.**

आज दिनांक १५.१०.२०२१ रोजी विजयादशमी (दसरा) औचीत्य साधुन वाशिम जिल्हा पोलीस दलांकडुन पोलीस मुख्यालय वाशिम येथे शस्त्रागार विभागामध्ये शस्त्रपुजनाचे आयोजन करण्यात आले. त्याप्रसंगी वाशिम जिल्हा पोलीस दलाचे शस्त्रागारात असलेल्या एस.एल.आर रायफल,एमपी–५, इन्सास रायफल,कार्बाइन,ब्लॉक पिस्टल, शॉर्ट गन, गॅस गन,३८ रिव्हॉलवर, अशा विविध प्रकारच्या शस्त्रांची व्यवस्थित रित्या मांडणी करण्यात आली. मा. पोलीस अधीक्षक श्री. बच्चन सिंग यांचे हस्ते शस्त्र पुजन करण्यात आले. शस्त्राागार मधील सर्व हत्याऱ्यांची पाहणी करुन सर्व शस्त्रे अदयावत असल्याबाबत खात्री केली.

त्याचप्रमाणे वाशिम जिल्हा पोलीस दलांतील मोटार परिवहन विभाग येथे देखील वाहनाचे पुजन करण्यात आले नवरात्र सणाचे औचित्य साधुन मा. पोलीस अधिक्षक यांनी वाहनांची पुजा महिला पोलीस अंमलदार वैशाली इंगाले यांच्या हस्ते करुन नारी शक्तीचा सन्मान केला.

दिनांक १५/१०/२१ रोजी थोर शास्त्रज्ञ तथा भारत देशाचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम, यांची जयंती निमीत्त पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम येथे मा. पोलीस अधीक्षक श्री. बच्चन सिंग यांनी डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे प्रतिमेचे पुजन करून त्यांचे स्मृतीस उजाळा दिला. यावेळी अपर पोलीस अधीक्षक श्री. गोरख भामरे, प्रभारी पोलीस उपअधीक्षक (गृह) श्री. देवराव खंडेराव, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा श्री. सोमनाथ जाधव राखीव पोलीस निरीक्षक पो.मु. वाशिम श्री. मांगीलाल पवार, राखीव पोलीस उपनिरीक्षक श्री. राठोड व मोठया संख्येने हजर असलेले पोलीस अधिकारी /अंमलदार यांनी देखील प्रतिमेचे पुजन केले. त्याप्रसंगी मा. पोलीस अधिक्षक श्री.बच्चनसिंह यांनी उपस्थित सर्व अधिकारी/अंमलदार यांना विजयादशमी दसऱ्याच्या शुभेच्छा देऊन सर्वांच्या इच्छा आकांक्षा पुर्ण होवोत अशी मनोकामना व्यक्त केली.

15/10/21

( श्री. देवराव खंडेराव )
प्रभारी पोलीस उपअधीक्षक (गृह)